ठाणे, गुरुवार दि. २५ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८७ पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेत फूट

स्वाभिमानी शेतकरी संघटनेत नुकतेच वाद झाले आहेत. त्यामुळे पक्षाचे नेते रविकांत तुपकर यांना यांची पक्षातून हक्कालपट्टी करण्यात आली आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांची राजकीय ......पान ४ वर

## शामराव पेजे इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित ठाणे यांच्याकडून शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

...पान ४ वर



आनंद मिळू शकतो, अगदी अंधारातही, जर एखाद्याने फक्त प्रकाश चालू ठेवला तर

वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



तुमचे जीवन प्रकाशमय करण्यासाठी सतत प्रयत्नशील...

torrent POWER

अपनी भिवंडी उज्ज्वल भिवंडी

रोशन हमारा... शील मुम्ब्रा कलवा

connect.torrentpower.com

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank

आता व्यावसायिकांना अधिक सुलभ, जलद QR कोड सेवा

QR कोडच्या खात्रीशीर आर्थिक व्यवहाराला आता गतिशील आवाजा सहित SMS ची जोड




TJSB Sandesh

ठळक वैशिष्ट्ये
- प्रत्येक यशस्वी व्यवहार sms व आवाजा सोबत
- एकापेक्षा जास्त मोबाईलवर सुविधा
- सेवा अँड्रॉइडवर उपलब्ध
- स्थानिक भाषेच्या पर्यायासहित

GET IT ON Google Play

सारस्वत बँक

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

विश्वासाच्या नात्याची अविरत परंपरा...

FIXED DEPOSITS
आकर्षक व्याजदर!

7.75% p.a.
ज्येष्ठ नागरिकांसाठी

7.25% p.a.
इतरांसाठी



अधिक माहितीसाठी आपल्या नजीकच्या शाखेशी किंवा www.saraswatbank.com या वेबसाईटवर संपर्क करा.

अटी लागू.

www.saraswatbank.com

ठाणे, गुरुवार दि. २५ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ८७ पाने : ८, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

वर्धापनदिन
१३ वर्षांची यशस्वी घोडदौड

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच ! ®

दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध संपादक : चंद्रकांत भोईटे



केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली

...पान ५ वर

मिरा भाईंदरच्या शेकडो जुन्या अनधिकृत धोकादायक इमारतींचाही होणार पुनर्विकास ; मुख्यमंत्री शिंदे यांचे आमदार प्रताप सरनाईक यांना सकारात्मक आश्वासन

...पान ५ वर



# मनोज जरांगेंचे आमरण उपोषण स्थगित

जालना – मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांनी जालन्यातील अंतरवाली सराटीत सुरू केलेले आमरण उपोषण स्थगित केले आहे. नारायणगडाचे मठाधिपती आणि गावातील महिलांच्याहस्ते ते उपोषण सोडलं आहे. ज्यूस पिऊन त्यांनी हे उपोषण सोडले असून तब्येत ढासळल्याने आमरण उपोषण स्थगित केल्याचे सांगण्यात आले आहे. त्यांना गावकऱ्यांनी आणि समर्थकांनी उपोषण मागे घेण्याचा आग्रह धरला होता. दरम्यान, आज सकाळीच तब्येत ढासळल्याने मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेत असल्याची माहिति माध्यमांशी बोलताना दिली होती.



- नारायणगडाचे मठाधिपती आणि गावातील महिलांच्या हस्ते ५ दिवसोडले उपोषण
- तब्येत ढासळल्याने घेण्यात आला निर्णय

### रात्री गावकऱ्यांनी ऐकलं नाही, मला सलाईन लावले

सरकार आमरण उपोषण शक्तीला घाबरत आणि त्यांच्या सत्तेच्या खुर्चीला घाबरतात मला उपोषण करू द्या म्हणून मी गावकऱ्यांना म्हणत होतो. रात्री गावकऱ्यांनी ऐकलं नाही त्यांनी मला सलाईन लावले. सलाईन वर पडू न राहण्यात उपयोग नाही, त्यापेक्षा उपोषण न केलेलं बरं या मतावर मी आलो आहे. तिथे पडून राहण्यापेक्षा मी मतदार संघाची तयारी करेल असेही जरांगे (चरपेक्ष गरीरपसश) पुढे म्हणालेत.

### पडून राहण्यापेक्षा निवडणुकीची तयारी सुरू केलेली बरी

या ठिकाणी पडून राहण्यापेक्षा पुढच्या निवडणुकीची तयारी सुरू केलेली बरी. सरकारचा ज्या सत्तेत आणि खुर्चीत जीव आहे, त्यांच्यासाठीच्या तयारीला आपण लागलं पाहिजे. सभा, कार्यक्रम, निवडणुका, दौरे, कोणाला निवडून आणायचं कोणाला पाडायचं, कोणते आमदार विरोधात बोलत आहेत, कोणते खासदार विरोधात बोलत आहोत त्यांचा बंदोबस्त लावणे गरजेचे आहे, एकच सांगतो मराठा समाजाला कधीही भाजप सत्तेवर येऊ देऊ नका. म्हणून इथं उपचार घेत उपोषण करण्यापेक्षा एक दोन दिवस उपचार घेऊन तयारीला लागणार आहे. आज दुपारी बारा वाजता मी उपोषण स्थगित करणार आहे, अशी माहिती जरांगेंनी माध्यमांशी बोलताना दिली आहे

## विधानसभा निवडणुकीसाठी मविआच्या जागावाटपाचे सूत्र ठरले

मुंबई: लोकसभा निवडणुकीत दणदणीत कामगिरी करणाऱ्या महाविकास आघाडीचे नेते आता विधानसभेच्या तयारीला लागले आहेत. गेल्या काही दिवसांपासून मविआतील (चत– –श्रश्ररळपलश) तिन्ही पक्षांनी विधानसभा निवडणुकीच्यादृष्टीने मोर्चेबांधणी आणि आढावा घ्यायला सुरुवात केली आहे. विधानसभा निवडणुकीत कोणत्या जागांवर दावा सांगायचा, यासाठी मविआतील तिन्ही पक्षांची चाचपणी सुरु होती. या प्राथमिक चाचपणीनंतर मविआने विधानसभा निवडणुकीत जागावाटप कसे होणार, हा तिढा काही अंशी सोडवला आहे.

मविआचे शिल्पकार शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी नुकतीच एक बैठक झाली. या बैठकीत संपूर्ण जागावाटप कसे होणार, हे स्पष्ट झाले नसले तरी काही जागांबाबत अंतिम निर्णय झाला आहे. प्राथमिक जागावाटपासाठी नेत्यांनी एक सूत्र निश्चित केले आहे. ज्या मतदारसंघांमध्ये ज्या पक्षाची जास्त ताकद त्यांना तो मतदार सोडला जाणार, यावर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे एकमत झाले आहे. शरद पवार यांच्या निवासस्थानी काँग्रेस नेत्यांच्या झालेल्या बैठकीत यावर चर्चा झाली. त्यानुसार महाविकास आघाडीतील विद्यमान आमदारांच्या पहिल्या जागा त्या पक्षांना वाटल्या जातील. त्यानंतर सत्ताधारी पक्षांच्या मतदार संघांमध्ये महाविकास आघाडीतील ज्या पक्षाची जास्त ताकद आहे, त्या पक्षाला ती जागा सोडली जाईल. या सूत्रानुसार लवकरात लवकर जागांची चाचपणी करायला सुरुवात करण्याचे आदेश काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी दिले आहेत. महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांची एक समन्वय समिती तयार करून यावरती चर्चा करायला सुरुवात होणार आहे

### खोटं आणि बेगडी उपोषण मी करणार नाही

यावेळी बोलताना जरांगे म्हणाले, मी उपोषण करायला तयार आहे. मात्र, गावकऱ्यांनी उपचार घेण्यासाठी पाणी पिण्यासाठी किंवा सलाईन लावण्यासाठी आग्रह करायचा नाही. विना उपचार घेता आणि सलाईन न लावता मी मरेपर्यंत उपोषण करायला तयार आहे. सलाईन लावून मी उपोषण करायला तयार नाही. खोटं आणि बेगडी उपोषण मी करणार नाही. उपचार बंद करा मी उपोषण करायला तयार आहे, असंही जरांगेंनी पुढे म्हटलं आहे. तर सलाईन लावून पडून राहण्यापेक्षा उपोषण न केलेलं बरं असंही जरांगेंनी म्हटलं आहे.

## उमेदवार पाडणार म्हणता, मग तुम्हाला महाविकास आघाडीचा छूपा पाठिंबा आहे का?

### १३ ऑगस्टनंतर रणनीती ठरणार

छत्रपती संभाजीनगर : सलाईन लावून उपोषण करण्यात काहीच अर्थ नाही, म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी काल अंतरवाली सराटीमधील आमरण उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. पाचव्या दिवशी जरांगे पाटील यांनी उपोषणाचा निर्णय स्थगित करत उपचारासाठी रुग्णालयामध्ये दाखल झाले आहेत. दरम्यान, पाटील यांनी उपोषणाचा निर्णय मागे घेतला असला, तरी सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणीसाठी कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नाही आणि १३ ऑगस्टनंतर आम्ही आमची रणनीती जाहीर करू, असा इशारा सुद्धा जरांगे पाटील यांनी दिला आहे.

### मी स्वत: निवडणुकीसाठी उभा राहणार नाही, पण इतरांना तयार करावं लागेल

दरम्यान, मनोज जहांगे पाटील यांनी आज रुग्णालयामध्ये पोहोचल्यानंतर पुन्हा एकदा सगेसोयऱ्यांवर निर्णय होत नसल्याने हल्लाबोल केला. मनोज जरांगे पाटील म्हणाले की सलाईन लावून उपोषण करणे योग्य नसल्याने स्थगित केलं आहे. आम्ही २८८ जागांवर उमेदवार देणार आहोत. मात्र त्याबाबतीत १३ ऑगस्टनंतर निर्णय स्पष्ट करू. मी स्वतः निवडणुकीसाठी उभा राहणार नाही, पण इतरांना तयार करावं लागेल, असं त्यांनी नमूद केले. आरक्षण द्यायचं ठरलं असेल, तर त्यांनी द्यावे अशी विनंती सरकारला त्यांनी केली. दरम्यान मराठ्यांचे विरोधात बोलतील ते उमेदवार आम्ही पाडणार असल्याचा इशारा पाटील यांनी दिला. ते म्हणाले की हे जाणूनबुजून मराठ्यांना टार्गेट करतात, मराठा सोडून काही बोलत नाहीत आणि आंदोलन मी यावरच बोलत राहतात. त्यामुळे त्यांना पाडणार असल्याचं पाटील म्हणाले. त्यामुळे आता आम्हाला त्रास देणाऱ्यांची सुट्टी नसल्याचे त्यांनी सांगितले. मी सरकारला निर्णय घेण्यासाठी वेळ दिला नाही असं नको. सरकार म्हणून शेवटी प्रक्रिया आहे वेळ देणं ही सुद्धा प्रक्रिया आहे. आम्ही आमचं प्रामाणिकपणे काम करत आहोत, सरकारने सुद्धा सरकारने प्रामाणिकपणे आपलं काम केलं पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली.

### महाविकास आघाडीचा छुपा पाठिंबा आहे का?

दरम्यान, आगामी निवडणुकीमध्ये महायुतीचे उमेदवार पाडणार म्हणत, तर तुम्हाला महाविकास आघाडीचा छुपा पाठिंबा आहे का? अशी विचारणा केली असता म्हणून जरांगे पाटील यांनी उत्तर दिले ते म्हणाले की छुपा पाठिंबा त्यांनी दाखवून द्यावा असे आव्हान त्यांनी दिले. आरोप करणाऱ्यांना ते म्हणाले की काही नसून मला जेलमध्ये टाकायचे म्हणतात. मात्र लाज वाटली पाहिजे अशी टीका त्यांनी केली. दरेकर आणि भाजपच्या नेत्यांकडून होणाऱ्या टिकेला सुद्धा त्यांनी उत्तर दिले. ते म्हणाले की दरेकर, राणे मैदानात उतरले आहेत. मैदानातील पिल्ले मैदानात येणारच अशी खोचक टीका त्यांनी केली. ज्या दिवशी मी यांच्यावर बोलेन, त्या दिवशी त्यांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही असा इशारा सुद्धा जरांगे पाटील यांनी दिला.

दैनिक महाराष्ट्र सम्राटच्या १३ व्या वर्धापन दिना निमित्त हार्दिक शुभेच्छा

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेत फूट

स्वाभिमानी शेतकरी संघटनेत नुकतेच वाद झाले आहेत. त्यामुळे पक्षाचे नेते रविकांत तुपकर यांना यांची पक्षातून हक्कालपट्टी करण्यात आली आहे. माजी खासदार राजू शेट्टी यांची राजकीय भूमिका सतत बदलत गेल्याने शेतकरी संघटनेचे नुकसान झाल्याचा आरोप करत शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र क्रांतीकारी आघाडीची घोषणा केली आहे. खरे तर राजू शेट्टी हे शेतकरी आंदोलनापासून दूर जात असल्याचे दिसत आहे. त्यांची भूमिका शेतकरी हितासाठी कमी आणि राजकीय जास्त वाटू लागली आहे. रविकांत तुपकरांनी नव्या आघाडीच्या वतीने विधानसभेच्या २५ जागा लढविणार असल्याचेही जाहीर केले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून नुकतीच तुपकर यांची हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर तुपकर यांनी पुण्यात सहकाऱ्यांची बैठक घेऊन हकालपट्टीच्या निर्णयावर आणि पुढील राजकीय मोर्चेबांधणीवर चर्चा केली. त्यांनी स्वतःची राजकीय आघाडी काढली असून शेतकऱ्यांची संघटना दुभंगली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून हक्कालपट्टी झाल्यानंतर रविकांत तुपकर यांनी आपले मत मांडले आहे की, माझी काहीही चूक नसताना शेट्टी यांच्या सांगण्यावरून हकालपट्टी करण्यात आली आहे. शिस्त पालन समितीला ऑगस्ट २०२३ मध्येच मी माझे मत लेखी कळविले होते. त्याचे उत्तर अद्याप मला मिळालेले नाही. शेट्टी यांनी कोल्हापूर जिल्ह्यात राजकारण करताना सतत स्वतःच्या सोयीची भूमिका घेतली. कधी भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी, तर कधी रिडालोस सारखा प्रयोग केला. राजकीय स्वार्थासाठी त्यांनी सतत भूमिका बदलल्यामुळेच शेतकरी संघटनेचे नुकसान झाले आहे. रविकांत तुपकर यांचे मत चुकीचे वाटत नाही. सतत भूमिकेतील बदलामुळे राजकीय पक्ष विभागला जाण्याचा धोका अधिक असतो. राजू शेट्टी यांच्या बाबतीत तेच झाले आहे. राजकारणापायी शेतकरी संघटना फुटत असताना शेतकरी नेत्यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे असे वाटते. रविकांत तुपकरांनी म्हटले आहे की, राजू शेट्टी यांची स्वाभिमानी शेतकरी संघटना कोल्हापुरातील तीन तालुक्यांपुरतीच होती. ती संघटना आम्ही राज्यभर नेली. शेट्टी यांनी ऊसदर आंदोलनाच्या बाहेर जाऊन काहीच केले नाही. आम्ही विदर्भ, मराठवाड्यात कापूस, सोयाबीन दरासाठी आंदोलने करीत राहिलो, पण, शेट्टी आमच्या मागे समर्थपणे उभे राहिले नाहीत. आम्ही सतत संघर्ष केला म्हणून आम्हाला जनाधार मिळाला. आमचा वाढता जनाधार त्यांना नकोसा वाटत आहे. चळवळीतील कार्यकर्ता मोठा होऊ नये, असेच त्यांना वाटते. त्यांनी अनेकांची संघटनेतून हकालपट्टी केली. दोन दिवसांपूर्वी माझा नंबर लागला. मला संघटना सोडायची नव्हती, पण मला त्यांनी संघटनेबाहेर काढले आहे, असेही तुपकर म्हणाले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पहिली फूट पडली होती, ज्यावेळी सदाभाऊ खोत हे राजू शेट्टींचे मित्र संघटनेतून बाहेर पडले होते. सदाभाऊ खोत यांनी भाजपाशी जवळीक करत रयत संघटना निर्माण केली. राजू शेट्टी यांनी सदाभाऊंना निवडणुकीला तिकीट दिले. त्या निवडणुकीत खोत हरले. भाजपाचे राज्य सरकार असताना शेतकरी आंदोलन जोरात सुरू होते. अशा वेळी भाजपाला खोतांसारखा शेतकरी नेता आंदोलन मिटविण्यासाठी पाहिजे होता. साहजिकच सदाभाऊंना कृषी राज्यमंत्री पदाची लालूच दाखवत त्यांना मंत्रिमंडळात घेतले. त्यामुळे राजू शेट्टी एकटे पडले. या अनुभवातून ते आता शिकत आहेत, असे म्हणता येईल. राजू शेट्टी यांनी आत्मचिंतन केले पाहिजे, असे वाटते. कारण पक्षातून हकालपट्टी करण्याचे नक्की ठोस कारण हवे. सदाभाऊ खोत राजू शेट्टीना सोडून गेले आता रविकांत तुपकरही शेट्टींच्या पक्षात नाहीत. दोघांनीही बाहेर जाताच नाविनवपक्षांची उभारणी केली. यामागील नेमके सत्य काय ते पाहिले पाहिजे. शेतकरी संघटना आणि राजकारण हे भिन्न मार्ग आहेत. शेतकऱ्यांचा नेता नक्कीच संसदेत किंवा विधानसभेत गेला पाहिजे. परंतुकसत्तेशी जुळवून घेऊन तात्पुरते प्रश्न सुटतात. पुन्हा अशा काही घटना समोर येतात, त्यावेळी नेता ज्या उद्देशासाठी कार्य करतो, ते कार्य वेगळ्या राजकीय प्रवासात विलीन होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे शेतकरी नेत्यांनी आपली राजकीय पार्टी आणि संघटना यांबाबत दक्ष राहिले पाहिजे असे वाटते. रविकांत तुपकर यांची हकालपट्टी योग्य की अयोग्य हा मुद्दा नाही. परंतु शेतकरी संघटनेतून निर्माण झालेल्या पक्षाची फूट चळवळीसाठी नक्कीच धोकादायक आहे असे वाटते.

# २६ जुलैला मुंबईत 'पारंपारिक फॅशन शो'चे आयोजन

ठाणे - कारगिल विजय दिवसाला दि.२६ जुलै २०२४ रोजी पंचवीस वर्ष पूर्ण होत आहेत. या रौप्य महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून, देशासाठी शहीद झालेल्या वीरांच्या शौर्याची व बलिदानाची आठवण व सैनिकांप्रती असलेली देशभक्ती भारतीय जनतेच्या मनात सदैव जागृत राहावी, याकरिता मुंबईस्थित व्हॅलियंट फेम आयकॅान या सामाजिक संस्थेने दि.२६ जुलै २०२४ रोजी शहीद सैनिकांप्रती कृतज्ञतेची भावना म्हणून रश्र्ञर्षीींहशपरींळेप या विषयांतर्गत लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सभागृह, भायखळा, मुंबई येथे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या सहकार्याने पारंपारिक फॅशन शो (Walk For The Nation) चा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमास आर्मी, नेव्ही, एअरफोर्स अशा भारतीय संरक्षण दलातील तिन्ही विभागातील सेवानिवृत्त वरिष्ठ अधिकारी, प्रत्यक्ष कारगिल युध्दात पराक्रम गाजविलेले सैन्याधिकारी-जवान उपस्थित राहणार असून ते या कार्यक्रमात या शौर्य दिवसाच्या निमित्ताने इतर स्पर्धकांसह रॅम्प वॉक (Walk For The Nation) करणार आहेत. तसेच मनोरंजनाच्या कार्यक्रमाबरोबरच देशभक्तीपर डॉक्युमेंटरीज व लोककलेचेही सादरीकरण या कार्यक्रमात होणार आहे. याबरोबरच ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांचा देशप्रेमावर आधारित शहीद कॅप्टन विनायक गोरे या एकपात्री प्रयोगाचेही सादरीकरण होणार आहे. एकंदरीतच आजच्या तरुण पिढीला भारतीय सैन्याविषयीची त्यांच्या परक्रमाबद्दलची माहिती व्हावी, त्यांच्याबद्दलचा आदरभाव, अभिमान, प्रेम वृध्दींगत व्हावे, त्यांची वीरवृत्ती, देशाप्रती त्यांची श्रद्धा, शारीरिक व मानसिक सामर्थ्य, स्वयंशिस्त या उद्दिष्टांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आजच्या तरुण पीढीला देशकार्यासाठी प्रोत्साहित करणे, समाजात ध्वजदिन निधीबाबत जागरुकता वाढावी, हा या कार्यक्रमाच्या आयोजनाचा प्रामाणिक प्रयत्न आहे. आपल्या भारतमातेसाठी सैनिकांनी केलेल्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याकरिता आपण सर्वांनी या कार्यक्रमास जरुर उपस्थित राहावे, या कार्यक्रमाची तिकिटे इ्ज़्ाीहु वर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी या तिकिटांद्वारे आपले आसन आरक्षित करावे किंवा ९१५२१ ५१२९६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेच्या संस्थापक-अध्यक्ष अंजली साखरे यांनी केले आहे.

**नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम**
बेलापूर भवन, ८ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४

**अभियांत्रिकी**
**ई-निविदा**

**निविदा सु. क्र.** नमुंमपा/परि/अभि/०२/२०२४-२५
**विषय : वोल्वो एसी बसेसवर जाहिरात हक्क देणे बाबत.**
सदर बाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. परिवहन व्यवस्थापक, नमुंमपा, परिवहन उपक्रम यांनी राखून ठेवलेला आहे.

जा. क्र.नमुंमपा/परि/प्रशा/७४६/२०२४
दि. २४.०७.२०२४

**सही/-**
**(योगेश कडुसकर)**
**परिवहन व्यवस्थापक**
**नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम**

# उत्तर प्रदेशातील गुंड व माफिया राजवर प्रकाश टाकणारा चित्रपट द युपी फाईल्स चित्रपट

मिरारोड (प्रतिनिधी ) - मिरा भाईंदर शहरातील प्रसिद्ध इमारत बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिक ओस्तवाल बिल्डर्स यांनी आता चित्रपट निर्मितीमध्येही आपले पाऊल टाकले आहे. त्यांची निर्मिती असलेला द यूपी फाइल्स हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. कारण हा चित्रपट देशातील मोठे राज्य असलेल्या उत्तर प्रदेशातील गुंड व माफियांवर आधारित आहे. या चित्रपटात प्रसिद्ध अभिनेते मनोज जोशी हे उत्तरप्रदेश राज्याचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटाविषयी माहिती देताना उमराव सिंग ओस्तवाल यांनी सांगितले की, मनोज जोशी आणि मंजरी फडणीस यांची प्रमुख भूमिका असलेला 'द यूपी फाइल्स' हा चित्रपट २६ जुलै रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. श्री ओस्तवाल फिल्म्स निर्मित, 'द यूपी फाइल्स' हा सत्य घटनेवर आधारित चित्रपट आहे. नीरज सहाय दिग्दर्शित आणि कुलदीप उमरावसिंग ओस्तवाल निर्मित, 'द यूपी फाईल्स' हा चित्रपट उत्तरप्रदेशच्या घटनांवर प्रकाश टाकणारा चित्रपट आहे, कथा आणि संवाद प्रेक्षकांच्या आवडीस उतरतील. मनोज जोशी पहिल्यांदाच मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये उत्तर प्रदेशातील गुंडाराजवर केलेली कारवाई आणि बलात्कार प्रकरणाचे चित्रण अतिशय वास्तव रित्या चित्रित करण्यात आले आहे. मंजरी फडणीस यांनी या चित्रपटात एका दमदार पोलीस महिलेची भूमिका साकारली




आहे. याशिवाय अवतार गिल, अली असगर, शाहबाज खान, मिलिंद गुणाजी, अमन वर्मा, अशोक समर्थ, अनिल जॉर्ज आदी कलाकारांचे या चित्रपटात अभिनय आहेत. संगीत दिलीप सेन यांनी दिले असून नृत्यदिग्दर्शन गणेश आचार्य यांचे आहे. चित्रपटाचे चित्रीकरण यूपी, जम्मू, मुंबई आणि राजस्थानमध्ये करण्यात आले आहे. हा चित्रपट सत्य घटनेवर निर्मित करण्यात आलेला असल्यामुळे प्रत्येक राजकिय, सामजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांनी पहावा त्यांना याचा फायदा होईल असे उमराव ओसवाल यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

स्वच्छ भारत एक कदम स्वच्छता की ओर

**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ,**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. अंनप/पाणी पुरवठा विभाग/२०२४-२५/१९३ दि. २३/०७/२०२४

**कोटेशन नोटीस**

अंबरनाथ नगरपरिषदेस खालील काम करावयाचे असुन, नोंदणीकृत ठेकेदार यांचेकडुन त्याबाबत सिलबंद कोटेशन्स मागविण्यात येत आहेत. ज्या कोणास सदर काम करावयाचे असेल त्यांनी सदर कामांचे दर सर्व करांसह बंद पाकीटात खाली सही करणार यांचेकडे दि. ०१/०८/२०२४ रोजी सायं. ३.०० वाजे पर्यंत आणून द्यावेत. तसेच आलेली कोटेशन त्याच दिवशी किंवा प्रशासनाच्या सोयीनूसार हजर कोटेशन धारकांसमक्ष उघडण्यात येतील. कोणतेही एक कोटेशन स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे. तसेच खालील पैकी कोणतेही एक कागदपत्र सादर न केल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रात खरेपणा न आढळल्यास कोटेशन फेटाळण्यात येतील याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. (GST वगळून) | इसारा रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ पश्चिमेकडील स्वामीनगर येथील मरीअम्मा माता मंदिर ओव्हर ब्रिज जवळील सार्व. शौचालयाची दुरुस्ती करणे. | ३,३२,७९६/- | ३३२८/- |

१) तांत्रिक बोलीचा लिफाफाक्र. ०१ — अ) पॅनकार्ड ब) ईपीएफ प्रमाणपत्र. क) कॉन्ट्रॅक्टर परवाना. ड) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र. इ) इसारा रक्कमेचा डी.डी

२) वित्तीय बोलीचा लिफाफाक्र. ०२
अ) मूळ प्रतितील दरपत्रक.

टिप :- सदर कोटेशन नगरपरिषदेच्या www.ambarnathcouncil.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
प्रत :- सुरक्षा विभाग नगरपरिषद नोटीस बोर्डावर प्रसिध्दीकरिता.

शिक्का

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
प्रशासक,
अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ

# ठामपातर्फे २७ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४' प्रदर्शन

ठाणे - पर्यावरणाचे संवर्धन होण्याच्या दृष्टीकोनातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे निर्देश राज्यशासनाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमातंर्गत पर्यावरणाला पूरक अशा घटकांपासून तयार केलेल्या गणेशमूर्ती, मखर व इतर सजावटीच्या साहित्याचे प्रदर्शन व विक्री उत्सव २७ जुलै ते ४ ऑगस्ट २०२४ पर्यत ठामपा शाळा क्र. १९, विष्णुनगर, ठाणे येथे आयोजित केला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या शुभहस्ते व ठाणे शहरातील मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत होणार आहे. प्लास्टर ऑफ पॅरिस बनविलेल्या मुर्त्यांमुळे पर्यावरणाचा -हास होतो, पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्यासाठी सातत्याने महापालिकेतर्फे विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. गणेशभक्तांना पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती व इतर साहित्य यांचे विविध पर्याय उपलब्ध करुन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचाच एक भाग म्हणून ठाणे महापालिका क्षेत्रातील गणेश मूर्तीकारांना शाडूची माती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच प्रभागसमितीनिहाय मोफत जागा ही देण्यात आली असल्याचे मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी नमूद केले. पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ या उपक्रमामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतून कुशल मूर्तीकारांनी शाडू माती, लाल माती, गोमय, पुठ्ठा तसेच कागदाचा लगदा व पर्यावरणस्नेही रंग इत्यादीपासून बनविलेल्या आकर्षक गणेशमूर्ती तर मखर व सजावटीचे इतर साहित्य देखील उपलब्ध असणार आहे. उत्सवादरम्यान विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले असून 'पर्यावरणपूरक उत्सव - काळाची गरज' या विषयावर तज्ञ व्यक्तींचा परीसंवाद, नागरिकांसाठी निष्णात मूर्तिकारांकडून मातीच्या गणेशमूर्ती घडविण्याची कार्यशाळा, कागद - पुठ्ठा यापासून सजावटीचे साहित्य बनविण्याचे प्रशिक्षण, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धासोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली. या प्रदर्शनास जास्तीत जास्त नागरिकांनी भेट देवून यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक असा साजरा करावा असे आवाहनही ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय,भाईंदर (प.)
जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८, Email :- pro@mbmc.gov.in
**माहिती व जनसंपर्क विभाग**

जा.क्र. मनपा/मावज/E-२४०५७४५/२०२४-२५ दि. २४/०७/२०२४

**/// मुदतवाढ //**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने दि. १३/०७/२०२४ रोजीच्या आपल महानगर, द ग्लोबल टाईम्स व महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली निविदा सुचना क्र.०४ (२०२४-२५) (2024_MBMC_1051568_1) या कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ दि.२३/०७/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा स्विकारण्याची वेळ वाढवून दि. ३०/०७/२०२४ रोजी दुपारी १.०० पर्यंत करण्यात येत आहे. तसेच सदर निविदेची तांत्रिक बिड दि. ०१/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

इतर मजकूरात बदल नाही.

जा.क्र. मनपा/मावज/ई-२४०५७४५/२०२४-२५
दि. २४/०७/२०२४

सही/-
(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

शामराव पेजे इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित ठाणे यांच्याकडून

# शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

ठाणे - शामराव पेजे इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, ठाणे यांच्या शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना पुढीलप्रमाणे आहे. -

**योजनेचा उद्देश व स्वरूप -** इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता बँकेमार्फत मंजूर केलेल्या रू.२०.०० लक्ष पर्यंत कर्ज रकमेवरील व्याज परतावा (कमाल १२ टक्केपर्यंत) महामंडळाकडून वितरीत केला जाईल.

**१. राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी -** महत्तम कर्ज मर्यादा रू.१०.०० लक्ष पर्यंत.

**२. परदेशातंर्गत** (Foreign) **अभ्यासक्रमासाठी -** महत्तम कर्ज मर्यादा रू.२०.०० लक्ष पर्यंत.

**- लाभार्थी पात्रतेच्या अटी व शर्ती -** १.अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे. २.अर्जदार हा इतर मागास प्रवर्गातील असणे तसेच तो महाराष्ट्राचा रहीवासी असावा. ३.अर्जदाराचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामिण व शहरी भागाकरीता रू.८.००लक्ष पर्यंत असावी. ४.अर्जदार हा इयत्ता १२ वी ६०% गुणांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या व्दितीय वर्षे व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६०% गुणांसह पदवीका (Diploma) उत्तीर्ण असणे आवश्यक. ५.अर्जदाराचा सिबील क्रेडीट स्कोअर ०, -१ (म्हणजेच यापूर्वी त्याने कर्ज घेतलेले नसावे) किंवा किमान ५०० पेक्षा जास्त असावा.

**- कर्ज प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे -** १.अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील (OBC) जातीचा दाखला. २. रू.८.०० लक्ष पर्यंतचा उत्पन्नाचा दाखला (तहसिलदार कार्यालयाकडून निर्गमित केलेला). ३. महाराष्ट्र रहिवासी (वय अधिवास) दाखला (तहसिलदार कार्यालयाकडून निर्गमित केलेला). ४.अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधार कार्ड. ५. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट फोटो. ६. शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परिक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका. ७.अर्जदाराचा जन्माचा / वयाचा पुरावा. ८.शैक्षणिक शुल्क संबधित संस्थेचे पत्र. ९.आधार संलग्न बँक खाते पुरावा. १०.मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा. ११.शिष्यवृत्ती (Scholarship), शैक्षणिक शुल्कमाफी (Free ship), पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र. १२. तसेच इतर आवश्यक कागदपत्रे.

**- कार्यपद्धती -** ही योजना पूर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर नोंद करणे आवश्यक आहे. शैक्षणिक कर्ज योजनेतंर्गत येणारे अभ्यासक्रम.

**अ.राज्यांतर्गत येणारे अभ्यासक्रम -** १.आरोग्य विज्ञान - MBBS, BDS, BAMS, BHMS, B. Pharm, व संबधीत विषयांतील सर्व पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम. २.अभियांत्रिकी - B.E, B.Tech., इ. Arch (सर्व शाखा), तसेच संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम इ. ३.व्यावसायिक अभ्यासक्रम - LLB, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटेरिंग, फॅशन टेक्नोलॉजी, इंटेरिअर डिझाईन पदवी, बॅचलर ऑफ डिझाईन, फिल्म व टेलीव्हिजन अभ्यासक्रम, सनदी लेखापाल/ कंपनी सचिव, पायलट, SHIPPING, MB-, MC-, विषयांतील पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम, इ. ४.कृषी अन्नप्रकीया व पशुविज्ञान - Animal Fishery Sciences, B.Tech., BVSC (Bachelor of Veterinary Science), B.Sc. (कृषी व दुग्ध विज्ञान) व संबधित विषयांतील सर्व पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रम.

**ब. देशांतर्गत अभ्यासक्रम -** केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खाजगी मान्यताप्राप्त (NACC मानांकन प्राप्त) शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी शासनमान्य प्रात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्यानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरीता पुढे नमूद केलेल्या आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापन, कृषी अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान या अंतर्गत येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

**क.परदेशांतर्गत अभ्यासक्रम** (Foreign Education) - १.आरोग्य विज्ञान - Doctor OF Medicine (MD), Master of Science (MS), २.अभियांत्रिकी - Civil, Mechanical, Electrical, Computer, Biotechnology, Generic Engineering, -rchitecture, etc., ३.व्यावसायिक व व्यवस्थापन - MBA, Hotel Management, LLB, LLM. ४. विज्ञान - Agriculture, Horticulture, Generic Science, Maths, Physics, Chemistry, Botany, Zoology, etc., ५.कला (-rt) - Fine Art, Film Making, Animation, Design, Fashion.

**इतर अटी व शर्ती -** परदेशी अभ्यासक्रमांतर्गत शैक्षणिक कर्ज व्याज परतावा लाभ घेण्याकरीता खालील आवश्यक कागदपत्रे अनिवार्य - १.परदेशी शैक्षणिक संस्थेत परदेशी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी करीता QS (Quacquarelli Symonds) च्या रँकींग / गुणवत्ता निकषांनुसार संस्थेचे स्थान २०० पेक्षा आतील असावे. २. परदेशी अभ्यासक्रमाकरीता पात्रता परीक्षा (Graduate Record Exam- GRE), Test OF English as a Foreign Language (TOEFL) उत्तीर्ण विद्यार्थी. व्याज परतावा व परतफेडीचा कालावधी - जोपर्यंत शिक्षण चालू आहे तोपर्यंत व्याज परतावा मिळेल. अर्जदाराने बँकेने मंजूर केलेल्या कर्जाची नियमीत परतफेड केलेल्या हप्त्यामधील नियमित असलेल्या व्याज रकमेचा परतावा (कमाल १२ टक्के पर्यंत) महामंडळ अदा करेल. व्याज परतावासाठी जास्तीत जास्त ५ वर्षे कालावधी ग्राह्य धरण्यात येईल. महामंडळाचा पत्ता व संपर्क :- शामराव पेजे इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. ठाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन कळवा, ठाणे २ रा मजला , दत्तवाडी स्वामी समर्थ मठासमोर, सह्याद्री शाळेच्या बाजुला खारेगांव, कळवा, ठाणे - ४००६०५, दूरध्वनी क्र.०२२-२०८१३६२५, भ्रमणध्वनी क्र.९८६९२८१७८७, ९२२६०९०९०९, ८७९३५७६५०३, इमेल :- dmobcthanegmail.com / www.msobcfdc.org. ही योजना पुर्णपणे ऑनलाईन असून ज्या उमेदवारांना शैक्षणिक कर्ज योजनेचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी आपले अर्ज महामंडळाच्या www.msobcfdc.org या संकेतस्थळावर नोंद करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या पत्यावर अथवा महामंडळाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे ठाणे जिल्हा व्यवस्थापक (अ.का.) निशिकांत नार्वेकर यांनी कळविले आहे.

**BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION BHIWANDI (Dist. Thane) MAHARASHTRA**
OLD S.T. STAND. KAP-ALI, BHIWANDI - 421 302, DIST. THANE

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि.ठाणे, महाराष्ट्र,**
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी भिवंडी - ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/८०९
दि. २४/०७/२०२४

**पाणी पुरवठा विभाग**

**ई- निविदा सुचना क्रमांक ०६ सन २०२४-२५ (पहिल्यांदा प्रसिध्दी)**

**खालील काम करण्याकरीता सक्षम व अनुभवी ठेकेदारांकडून ई-निविदा भागविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | कामाचा स्वरुप अंदाजित खर्च निविदा फॉर्म फी | निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | वॉर्ड क्र१३ मध्ये कल्याण रोड येथे साईबाबा मंदिर समोर ते नॅशनल मार्बल पर्यंत ४ इंच व्यासाची पाईप लाईन टाकणे बाबत. रु.९,९१,०१५/- रु.२३६०/- | दि. २५/०७/२०२४ ते दि. ०१/०८/२०२४ |
| १ | वॉर्ड क्र. १२ न्यु आझादनगर हालीम बंगला ते अलहिरा मस्जिद पर्यंत ४ इंच व्यासाची नविन पाईप लाईन टाकणे बाबत. रु.४,४७,९६४/- रु.२३६०/- | |
| | सदर निविदा बाबतची माहिती मनपा संकेतस्थळावर mahatenders.gov.in वर दिनांक २५/०७/२०२४ पासुन उपलब्ध आहे. | |

**सही/-**
**(संदिप पटणावर)**
**प्र. कार्यकारी अभियंता (पा.पु.वि.)**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.**

# केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली

## राष्ट्रवादी काँग्रेस- शरदचंद्र पवार पक्षाने केले गाजर आंदोलन

ठाणे : केंद्र सरकारने अर्थसंकल्प केला सादर... महाराष्ट्राच्या हातात दिले गाजर, अशा घोषणा देत राष्ट्रवादी काँग्रेस -शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार ठाण्यात गाजर आंदोलन केले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी नुकताच अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात बिहार आणि आंध्रप्रदेशावर खैरात केली असली तरी महाराष्ट्राला फारसे काही दिलेले नाही. त्याविषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस -शरदचंद्र पवार पक्षाचे आज शहराध्यक्ष सुहास देसाई आणि कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली ठाण्यात जोरदार निदर्शने केली. राष्ट्रवादी काँग्रेस -शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून केंद्र सरकारच्या निषेधार्थ घोषणा देण्यात आल्या. या प्रसंगी सर्व कार्यकर्त्यांनी हातात गाजर घेतले होते. अर्थसंकल्पात एकच दोष... महाराष्ट्र रोष असा संदेश असलेले बॅनर्स आणि फलक झळकवत सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

या प्रसंगी सुहास देसाई म्हणाले की, केंद्र सरकार हे महाराष्ट्राचा द्वेष करणारे सरकार आहे. आधी महाराष्ट्रातील उद्योग पळविले अन् आता अर्थसंकल्पात तोंडाला पाने पुसली आहेत. वास्तविक पाहता, महायुतीच्या खासदारांनी महाराष्ट्रासाठी संघर्ष करायला हवा होता. मात्र, हे खासदार गप्प बसले आहेत. जर आंध्र आणि बिहारवर खैरात केली जात असेल तर महाराष्ट्रावरील अन्यायाबाबत जाब विचारण्याची धमक भाजप, शिंदेगट आणि




अजित पवार गटाने दाखवायला हवी होती. पण, ते तसे करू शकत नाहीत. हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, अशी टीका केली. या आंदोलनात महिलाध्यक्षा सुजाताताई घाग, युवक अध्यक्ष विक्रम खामकर, विद्यार्थी अध्यक्ष प्रफुल कांबळे, युवती निरीक्षक प्रियांका सोनार, ओबीसी सेल अध्यक्ष गजानन चौधरी, हॉकर्स सेलचे सचिन पंधेरे, असंघटीत कामगार सेलचे राजू चापले, महाराष्ट्र प्रदेश प्रवक्त्या रचना ताई वैद्य,दिपक क्षत्रिय, मिलिंद भाऊ बनकर, राजेश कदम, राजेश ज. साटम, ठाणे विधान सभा अध्यक्ष महेंद्र पवार, संदिप पवार, संजीव दत्ता, शुभम व्दिवदी, धर्मेंद्र अस्थाना, शिवा यादव, कुळविंदर सिंग सोखी, आशिष उमासरे, माधुरी सोनार, अरविंद मोरे, पटेल भाभी, ज्योती निंबाळकर, शुभांगी खेडकर, शशी पुजारी, आरती गायकवाड, राणी देसाई, नितीन आहेर, हिरु गंगावणे, मनिषा म्हात्रे, साहिल उदगाडे, वैभव खोत,पुरोषत्तम पाटील ,कैलास सुरकर, राहु पाटील, विलास पाटील, शेखर भालेराव, रिंकू सिंह, समीर नेटके, आशिष खाडे, राजेश मिश्रा आदी सहभागी झाले होते.

# 'नैना'तील रस्त्यांसाठी पुन्हा निविदा

**पनवेल : नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (नैना प्रकल्प) पायाभूत सुविधा उभारण्यासाठी सिडको महामंडळाने पुढाकार घेतला आहे. मंगळवारी सिडकोने नैना प्रकल्पातील ८ ते १२ क्रमांकाच्या नगर नियोजन योजनेतील २० मीटर आणि त्यापेक्षा अधिक रुंदीचे रस्ते बांधणीसाठी ३ हजार ४७६ कोटी रुपयांच्या निविदा जाहीर केल्या. यापूर्वीही नैना प्रकल्पातील नगर नियोजन योजना क्रमांक २ ते ७ करिता ३ हजार १०० कोटी रुपयांच्या निविदा जाहीर करून या निविदा प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय सिडको लवकरच घेईल.**

सर्व निविदा प्रक्रिया वेळीच पार पडल्यास पुढील पाच वर्षांत नैना क्षेत्रात टप्प्याटप्प्याने रस्ते बांधण्यासाठी सुमारे साडेसहा हजार कोटी रुपयांची कामे सिडको हाती घेण्याच्या प्रक्रियेला सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांनी गती दिली आहे. सिडको महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाप्रमाणे नैना क्षेत्रात पायाभूत सुविधा उभारण्याला प्राधान्य दिले आहे. त्याच प्रयत्नांमुळे अनेक वर्षांची प्रतिक्षा असणाऱ्या नैना प्रकल्पातील सर्वच नगर नियोजन योजनेत रस्त्यांच्या कामांना गती दिली जात आहे.

नैना प्रकल्पातील रस्ते विनासिग्नल असावेत यासाठी हितेन शेठी असोशिएट्स या कंपनीला एकूण रस्ते बांधणीच्या खर्चातून २ टक्के रक्कम देऊन नैना प्रकल्पात रस्त्यांसाठी मार्गदर्शन करणार आहेत. याच कंपनीच्या क्षेत्रदेखरेखीखाली हे रस्ते बांधले जाणार आहेत. हे रस्ते बनविताना कमीत कमी सिग्नल यंत्रणेविना रस्ते बांधले जातील.

# ठामपातर्फे २७ जुलै ते ४ ऑगस्ट दरम्यान 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४' प्रदर्शन

ठाणे : पर्यावरणाचे संवर्धन होण्याच्या दृष्टीकोनातून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे निर्देश राज्यशासनाने दिले आहेत. या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेतर्फे पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमातंर्गत पर्यावरणाला पूरक अशा घटकांपासून तयार केलेल्या गणेशमूर्ती, मखर व इतर सजावटीच्या साहित्याचे प्रदर्शन व विक्री उत्सव २७ जुलै ते ४ ऑगस्ट २०२४ पर्यत ठामपा शाळा क्र. १९, विष्णुनगर, ठाणे येथे आयोजित केला आहे.

या उपक्रमाचे उद्घाटन महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या शुभहस्ते व ठाणे शहरातील मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीत होणार आहे.

प्लास्टर ऑफ पॅरिस बनविलेल्या मुर्त्यांमुळे पर्यावरणाचा -हास होतो, पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्यासाठी सातत्याने महापालिकेतर्फे विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. गणेशभक्तांना पर्यावरणस्नेही गणेशमूर्ती व इतर साहित्य यांचे विविध पर्याय उपलब्ध करुन देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचाच एक भाग म्हणून ठाणे महापालिका क्षेत्रातील गणेश मूर्तीकारांना शाडूची माती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच प्रभागसमितीनिहाय मोफत जागा ही देण्यात आली असल्याचे मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी नमूद केले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ या उपक्रमामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतून कुशल मूर्तीकारांनी शाडू माती, लाल माती, गोमय, पुठ्ठा तसेच कागदाचा लगदा व पर्यावरणस्नेही रंग इत्यादीपासून बनविलेल्या आकर्षक गणेशमूर्ती तर मखर व सजावटीचे इतर साहित्य देखील उपलब्ध असणार आहे. उत्सवादरम्यान विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले असून 'पर्यावरणपूरक उत्सव - काळाची गरज' या विषयावर तज्ञ व्यक्तींचा परीसंवाद, नागरिकांसाठी निष्णात मूर्तिकारांकडून मातीच्या गणेशमूर्ती घडविण्याची कार्यशाळा, कागद - पुठ्ठा यापासून सजावटीचे साहित्य बनविण्याचे प्रशिक्षण, शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धासोबतच विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली. या प्रदर्शनास जास्तीत जास्त नागरिकांनी भेट देवून यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक असा साजरा करावा असे आवाहनही ठाणे महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

'स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अभियान'अंतर्गत

# स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेचा आयुक्तांच्या हस्ते शुभारंभ



**भाईंदर : १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेचा कालावधी स्वच्छतेचा आणि आरोग्याचा परस्पर संबंध लक्षात घेऊन स्वच्छ केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशनच्या वतीने 'स्वच्छ सर्वेक्षण २०२४' अंतर्गत दिनांक २३ जुलै २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. सदर प्रसंगी अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त डॉ. सचिन बांगर,स्वच्छता निरीक्षक व सफाई कर्मचारी उपस्थित होते.**

स्वच्छता स्टार रँकिंग स्पर्धेत शहरातील गृहनिर्माण संस्था, शाळा (मि.भा.मनपा. व खाजगी), हॉटेल्स, मार्केट, शासकीय कार्यालये व हॉस्पिटल यांना सहभाग घेता येणार आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत लोकसहभागातून स्वच्छता विषयक उपक्रम राबविणे व या माध्यमातून नागरिकांच्या स्वच्छते विषयक वर्तणुकीमध्ये बदल घडविण्याकरिता स्वच्छता स्टार रँकिंग ही स्पर्धा राबविण्यात येत आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांना कचरा वर्गीकरण व ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया तसेच इतर स्वच्छता विषयक उपक्रम राबविण्यास प्रोत्साहन देणे व त्यामध्ये सातत्य ठेवून नागरिकांच्या सवयीत बदल घडवण्याकरिता विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. सदर स्पर्धेत स्वच्छ गृहनिर्माण संस्था, स्वच्छ शाळा, स्वच्छ हॉटेल व स्वच्छ मार्केट यांचे मानांकन करून रोख बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. तसेच स्वच्छ शासकीय कार्यालये व स्वच्छ हॉस्पिटल यांचे मानांकन करून त्यांस सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र महापालिकेकडून देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी महापालिका मुख्य कार्यालयात घनकचरा व्यवस्थापन विभागामध्ये नोंदणी करण्यात येईल. अर्ज स्वीकृती ही दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी पर्यंत मर्यादित असणार आहे. स्पर्धेचा कालावधी १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ असणार आहे. शहरातील जास्तीत जास्त संस्थांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून आपल्या मिरा भाईंदर शहराला देशात नंबर वन बनवण्यासाठी महानगरपालिकेस सहकार्य करण्याचे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# महिला अत्याचाराच्या गुन्ह्यांत वाढ

नवी मुंबई : नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात दोन दिवसांत महिला अत्याचाराचे चार गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे नातेवाईकांकडून मारहाण, कौटुंबिक अत्याचार आणि बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत हे गुन्हे नोंद असून यात पती विरोधातही एक गुन्हा नोंद आहे. काही दिवसांपूर्वीच कोपरखैरणे येथे चारित्र्याच्या संशयावरून एका पुरुषाने त्याच्या पत्नीला बेदम मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा नोंद झाला होता. आजही (मंगळवारी) पतीविरोधात त्याच्या पत्नीने पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यातील पीडित महिला आपल्या माहेरी आली असता पतीने तिच्या घरी येऊन तिला आणि तिच्या पालकांना शिवीगाळ करीत पीडित महिलेला धक्काबुक्की केली.

मिरा भाईंदरच्या शेकडो जुन्या अनधिकृत

# धोकादायक इमारतींचाही होणार पुनर्विकास

**भाईंदर : मिरा भाईंदर महानगर पालिका हद्दीतील १९९५ पूर्वीच्या ३० वर्षापेक्षा जास्त वयोमानाच्या जीर्ण व धोकादायक अनधिकृत ईमारतींचा पुनर्विकास होण्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज मंत्रालयात आमदार प्रताप सरनाईक यांनी भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून या मुद्यावर नगर विकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता यांच्या दालनात लगेच बैठकही झाली. पुढील एका महिन्यात राज्य सरकार याबाबत निर्णय घेणार असून त्यामुळे जुन्या धोकादायक इमारतीत राहणाऱ्या लाखो नागरिकांचा फायदा होणार असून या जुन्या अनधिकृत इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. एका महिन्यात राज्य सरकार याबाबत निर्णय घेणार आहे.**

## मुख्यमंत्री शिंदे यांचे आमदार प्रताप सरनाईक यांना सकारात्मक आश्वासन



आज आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांची शिवसेना मिरा भाईंदर शिष्टमंडळासोबत भेट घेऊन याबाबत निवेदन दिले व कार्यवाही करण्याची विनंती केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला व याबाबत नगरविकास विभागाला त्वरित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. त्या अनुषंगाने नगरविकास विभागाचे प्रधान सचिव श्री असिम गुप्ता यांच्या दालनात बैठक पार पडली. या बैठकीत सगळे मुद्दे प्रधानसचिवांसमोर मांडण्यात आले. याबाबत आमदार सरनाईक यांची मागणी मान्य करण्यात आली. पुढील एका महिन्यात मिरा भाईंदरचा सकारात्मक निर्णय होईल असे असीम गुप्ता यांनी आमदार सरनाईक यांना आश्वासित केले. या बैठकीस जिल्हा प्रमुख राजू भोईर, मिरा भाईंदर विधानसभा संघटक विक्रम प्रताप सिंह, ओवळा माजीवडा विधानसभा संघटक सचिन मांजरेकर, माजी नगरसेवक राजू वेतोसकर यांचा शिष्टमंडळात समावेश होता.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीमधील ३० वर्षापेक्षा जास्त वयोमानाच्या जीर्ण व धोकादायक इमारतींचा पुर्नविकास होणेबाबतची आमदार सरनाईक यांची मागणी मुख्यमंत्री शिंदे यांनी मान्य केली आहे. यात ज्या अडचणी येतील त्या दूर करून या इमारतींचा पुनर्विकास होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. आमदार प्रताप सरनाईक यांनी निवेदनात म्हटले आहे की, मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील मौजे भाईंदर काशीमिरा, नवघर, घोडबंदर, खारी, गोडदेव, महाजनवाडी व पेणकरपाडा या गावासांठी असलेल्या पाच ग्रामपंचायतीचे एकत्रीकरण करुन दि.१२/०६/१९९५ रोजी मिरा भाईंदर नगर परिषदेची स्थापना करण्यात आली.

ग्रामपंचायतीच्या कालावधीमध्ये स्टेशनच्या भागात रहिवास वापराच्या इमारतींचा फार मोठ्या प्रमाणात विकास झालेला असुन ३० वर्षापेक्षा जास्त वयोमानाच्या या सर्व इमारती आज धोकादायक अवस्थेत आहेत तसेच या सर्व इमारतींनी जास्तीचे चटई क्षेत्र त्यावेळी वापरले आहे. या इमारती मधील रहिवाशांनी मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क शासनास भरला आहे व आतापर्यंत मालमत्ता कर मनपाकडे भरला आहे. या सर्व इमारती अधिकृत असल्याबाबतचे पुरावे महानगरपालिके कडील अभिलेखात उपलब्ध नाहित. तसेच या गृहनिर्माण संस्था धारकांच्या जमिनीबाबतच्या ७/१२ उतारा सदरी बगर हुकूम बांधकाम अशी नोंद आहे. म्हणजेच बांधकाम परवानगी असल्याचे दिसुन येत नाही. ७/१२ उताऱ्यावर सदर इमारतीचे नाव आहे. तसेच सदरच्या जागेवर महापालिकेचे कोणतेही आरक्षण नाही व या इमारती रहिवास क्षेत्रात आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या तात्कालीन विकास नियंत्रण नियमावलीतील विनिमय क.३२ नुसार इमारत धोकादायक घोषीत केली असल्यास किंवा राहण्यायोग्य नसल्याचे घोषीत केले असल्यास सदर इमारतीचे पुर्नविकासास मनपा आयुक्तांची परवानगी अनुज्ञेय होती. त्यामध्ये इमारतीचे बांधकाम ०१/०६/१९९५ पुर्वीचे असणे आवश्यक होते. तसेच सदरचे बांधकाम अधिकृत किंवा अनधिकृत याबाबत उहापोह नसून त्यामध्ये इलेक्ट्रिक बिल, रेशनकार्ड, मालमत्ता पत्रक, इत्यादी कागदपत्रे आवश्यक होती. नविन णऊझठ मधील नियमावलीतील तरतुद ७.६.१ व ७.६.२ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावामधील इमारती धोकादायक मोडकळीस आलेल्या व त्या ३० वर्षापेक्षा जास्त वयोमानाच्या असल्यास व सदर इमारतीचे अधिकृततेबाबत कोणतेही पुरावे नसल्यास मनपाने दिलेल्या असेसमेंट उताऱ्यावरील क्षेत्र किंवा मनपाने दिलेले Existing Area Certificate darb क्षेत्र ग्राहय धरुन UDCPR मधील विनिमय ७.६ नुसार परवानगी दयावी. जेणेकरुन बेघर होणाऱ्यांना त्यांच्या हक्काचे व अधिकृत घर मिळू शकेल अशी मागणी आमदार सरनाईक यांनी केली. तसेच ज्या इमारती आरक्षणाच्या जागेत झालेल्या आहेत किंवा सरकारी जागेत झालेल्या आहेत. अशा इमारतींचा शासनाच्या झोपडपट्टी पुर्नवसन योजनेप्रमाणे पुर्नविकास करुन दयावा अशी विनंति आमदार प्रताप सरनाईक यांनी केली. याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने एका महिन्यात शासन निर्णय होणार आहे.

नेरूळ विभागात सानपाडा सेक्टर २१ येथील

# होल्डींग पॉंड भागातील अनधिकृत बांधकामावर कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्रातील सानपाडा, सेक्टर २१, भूखंड क्र.१ + २ए, नोड होल्डींग पॉन्डवर अतिक्रमण केल्याबाबत तेथील अनधिकृत बांधकाम धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ १(अ) अन्वये नोटीस बजाविण्यात आली होती. त्या नोटीसीची मुदत संपुष्टात येऊन सदर अनधिकृत बांधकाम संबंधितांकडून स्वत:हून हटविण्यात आले नाही.

त्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार, नेरूळ विभाग कार्यालयाच्या वतीने धडक कारवाई करीत २३ जुलै २०२४ रोजी सानपाडा, सेक्टर २१, भूखंड क्र. १+२ ए, नोड होल्डींग पॉंड याठिकाणी उभारण्यात आलेल्या ७ अनधिकृत गोडाऊनवर निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे.



या कावाईच्या माध्यमातून सदर भूखंड मोकळे करण्यात आले आहेत.

सदर कारवाई नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ. राहुल गेठे यांचे मार्गदर्शनाखाली व नेरूळ विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे यांच्या नियंत्रणाखाली, अतिक्रमण विभागातील अधिकारी-कर्मचारी, सुरक्षारक्षक, स्थानिक पोलीस यांच्या सहयोगाने करण्यात आली. या मोहीमेकरिता २० मजूर, १ मुकादम, १ गॅस कटर, २ जेसीबी, व १ डंपर अशाप्रकारे मनुष्यबळ व साधने वापरण्यात आली.

# दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर दर्यात जाण्यास नाखवा सज्ज

उरण : दोन महिन्यांच्या विश्रांतीनंतर १ ऑगस्टपासून मासेमारीचा नवा हंगाम सुरू होत आहे. यानिमित्ताने उरणच्या करंजा, मोरा तसेच ग्रामीण भागातील बंदरात तयारी सुरू झाली आहे. शासनाकडून १ जून ते ३१ जुलै दरम्यानची खोल समुद्रातील मासेमारीवरील दोन महिन्यांची बंदी कालावधी गुरुवारी १ ऑगस्टला संपणार आहे. त्यासाठी मच्छीमार नाखवा (बोटीचा मालक) दर्याला निघाला असून बंदरावर लगबग सुरू झाली आहे. उरणमधील करंजा व मोरा बंदरांसह इतर बंदरांतील मच्छीमार एक ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या नव्या हंगामाच्या तयारीला लागले आहेत. दोन महिन्यांच्या बंदीनंतर पुन्हा एकदा खोल समुद्रातील मासेमारी सुरू होणार असल्याने खवय्यांची ताज्या मासळीची समस्या दूर होणार आहे. यासाठी दोन महिन्यांपासून उभ्या करण्यात आलेल्या बोटींची रंगरंगोटी, त्यावरील उपकरणे, इंजिनची डागडुजी, छिद्र पडलेल्या जाळीची दुरुस्ती तसेच बोटी समुद्रात नेऊन त्यांची तपासणी आदी कामे सुरू आहेत. मत्स्यव्यवसाय विभागाकडून पावसाळ्यात दरवर्षी १ जून ते ३१ जुलै या कालावधीकरिता खोल समुद्रात मासेमारीस बंदी घालण्यात येते. त्यामुळे या बंदी काळाचा पुनर्विचार करण्याची ही मागणी पुढे येत आहे. या कालावधीत करंजा बंदरात मासेमारी करणाऱ्या अनेक बोटींवर मत्स्यव्यवसाय विभागाने कारवाई केली होती.

# 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांमध्ये उत्साह

**नवी मुंबई : 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेला नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महिला उत्साही प्रतिसाद देत असल्याचे दिसत असून महानगरपालिकेच्या वतीने समुह संघटक, आशा वर्कर मोठया प्रमाणात महिलांची भेट घेऊन त्यांना या योजनेची माहिती देत आहेत तसेच त्यांचे अर्जही भरुन घेतले जात आहेत. महिला व बालविकास विभागाच्या नारीशक्ती दूत पव्दारे प्राधान्याने ऑनलाईन अर्ज दाखल करुन घेतले जात असून ऑफलाईन अर्जही लेखी भरून घेतले जात आहेत.**

नमुंमपा क्षेत्रातील एकही पात्र महिला लाभ घेण्यापासून वंचित राहू नये याची काळजी घेऊन गतिमान कार्यवाही करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले असून त्यानुसार जास्तीत जास्त महिलांपर्यंत योजनेची माहिती पोहचवून त्यांचे अर्ज भरुन घेतले जात आहेत.

याकामी महिला बचत गटांचीही मदत घेतली जात असून समाज विकास विभागाचे समुह संघटक महिला बचत गटांपर्यंत पोहचून त्यातील पात्र महिलांचे अर्ज भरुन घेत आहेत तसेच त्या महिलांमार्फतही इतर महिलांपर्यंत पोहचून योजनेच्या माहितीचे प्रसारण केले जात आहे. याशिवाय आरोग्य विभागातील आशा वर्कर आपापल्या क्षेत्रातील घरांपर्यंत जाऊन पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

योजनेचे अर्ज भरण्यात महिलांना कोणतीही अडचण येऊ नये यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय तसेच ८ विभाग कार्यालय क्षेत्रातील १११ प्रभागांमध्ये 'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजना मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आले असून तेथे महिलांचा उत्साही प्रतिसाद मिळताना दिसत आहे. त्यासोबतच शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या वतीने चालविण्यात येणा-या २२६ अंगणवाड्यांमध्येही तेथील अंगणवाडी सेविकांकडून अर्ज भरण्याची कार्यवाही सुरू आहे. अर्ज दाखल करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नसून आत्तापर्यंत २२ हजारहून अधिक महिलांनी अर्ज दाखल केले असून ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे.

'मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या, निराधार महिला अशी ठेवण्यात आलेली आहेत. सदर महिलेने आधारकार्ड सादर करावयाचे असून कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखापेक्षा कमी असणे आवश्यक मतदार ओळखपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र अथवा जन्मदाखला यापैकी एक दाखला सादर करावयाचा आहे.




तसेच त्या कुटूंबातील एक अविवाहित महिला यांना त्यांच्या आधार लिंक असलेल्या सक्षम बँक खात्यात दरमहा रु. १५००/- इतकी रक्कम म्हणजेच दरवर्षी रू. १८ हजार रक्कम डिबीटीव्दारे प्राप्त होणार आहे.

या योजनेच्या लाभासाठी अर्जासोबत जोडावयची कागदपत्रे अत्यंत सोपी व सहज उपलब्ध होतील आहे. पिवळे अथवा केशरी रेशनकार्ड असल्यास उत्पन्न प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही, तसेच पांढरे रेशनकार्ड असल्यास अथवा कोणतेही रेशनकार्ड नसल्यास वार्षिक उत्पन्न २.५० लाखापर्यंत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे अधिवास प्रमाणपत्र किंवा १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड किंवा १५ वर्षापूर्वीचे इतर राज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील पुरूषासोबत विवाह केला असल्यास पतीचे अधिवास प्रमाणपत्र किंवा १५ वर्षापूर्वीचे रेशनकार्ड किंवा १५ वर्षापूर्वीचे मतदार ओळखपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र अथवा जन्मदाखला यापैकी एक दाखला ग्राह्य धरण्यात येणार आहे.

योजनेचे अर्ज पात्र महिला ह्या स्वत: नारीशक्ती दूत प / पोर्टलववरुन भरू शकतात अथवा नवी मुंबई महानगरपालिकेने स्थापित केलेल्या नजिकच्या मदत कक्षात अथवा अंगणवाडीमध्येही जाऊन भरू शकतात. अर्ज भरण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

योजनेविषयी कोणत्याही प्रकारच्या अधिक माहितीसाठी अथवा अडचण आल्यास निराकरणासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने ९९६९००८०८८ / ९७०२३०९०५४ / ९३७२१०६९७६ हे मोबाईल क्रमांक जाहीर केले असून याशिवाय शासनाच्या महिला व बालविकास विभागाने १८१ हा टोल फ्री महिला हेल्पलाईन नंबर जाहीर केलेला आहे. त्यावर नागरिक सहज संपर्क साधू शकतात.

तरी योजनेस पात्र लाभार्थी महिलांनी याची नोंद घेऊन नारीशक्ती दूत पव्दारे स्वत: अर्ज करावा अथवा महानगरपालिकेने सुरु केलेल्या आपल्या नजिकच्या मदत कक्षाला भेट देऊन अर्ज दाखल करावा असे आवाहन नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

मुंबई-नाशिक-मुंबई महामार्गावरील प्रवास लवकरच होणार सुकर


# मुंबई- नाशिक- मुंबई महामार्गावरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा

■ सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी दिले निर्देश

**ठाणे – शासन आणि प्रशासन हे जनतेसाठी काम करीत असते. जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, यासाठी सर्वांनी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. मुंबई–नाशिक–मुंबई महामार्गावरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी आज येथे दिले. मुंबई–नाशिक–मुंबई महामार्गाच्या सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा सार्वजनिक बांधकाम मंत्री दादाजी भुसे यांनी आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात घेतला, त्यावेळी ते बोलत होते.**




यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष श्री.अनिल गायकवाड, पोलीस अधीक्षक डॉ.डी. स्वामी, वाहतूक उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड,महामार्ग सुरक्षा पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, पोलीस उपायुक्त एस.व्ही.शिंदे, रस्ते वाहतूक व महामार्ग मुख्य अभियंता तथा प्रादेशिक अधिकारी अंशुमली श्रीवास्तव, एमएमआरडीए मुख्य अभियंता एस.के.सुरवसे, अधीक्षक अभियंता रमेश खिस्ते, भारतीय राजमार्ग प्राधिकरण प्रकल्प संचालक बी.एस. साळुंके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस.ए.तांबे, कार्यकारी अभियंता सुनिल पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, अवर सचिव दिपाली घोरपडे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.भुसे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना निर्देश दिले की, मुंबई–ठाणे–नाशिक हा महामार्ग ठाणे ते वडपे असा २३ किलोमीटर आणि वडपे ते नाशिक ९७ किलोमीटर असा मिळून १२० किलोमीटरचा असून महामार्गावर असणारे खड्डे तातडीने बुजवा, पुन्हा खड्डे होणार नाहीत, याची काळजी घ्या. पुलांची कामे लवकरात लवकर मार्गी लागण्यासाठी योग्य नियोजन करुन काम पूर्ण करा. आसनगाव जवळील रेल्वे पुलांचे काम प्रगतीपथावर आहे. हा पूल तयार होण्यासाठी तीन महिने लागणार आहेत, मात्र तोपर्यंत सध्या जो पूल आहे त्याची लवकरात लवकर दुरुस्ती करुन वाहतूक सुरळीत करा. ते पुढे म्हणाले, वडपे पासून पुलाची कामे लवकरात पूर्ण करा. अवजड वाहनांना वाहतुकीसाठी योग्य वेळेचे बंधन घालून वाहतूक कोंडी होणार नाही, याची दक्षता घ्यावी. कोणती वाहने कोणत्या लेन मध्ये चालली पाहिजेत, याचे नियोजन करा. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठाणे ते वडपे या भागात वाहतूक पोलिसांच्या मदतीला १७० पोलीस मित्र देण्यात आले आहेत. यांचा समन्वय साधून वाहतूक नियंत्रणाविषयी योग्य ते नियोजन करावे. सर्व यंत्रणांनी आपापसात आवश्यक तो समन्वय साधून नागरिकांना त्रास कमीत कमी कसा होईल, याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. मुंबई–नाशिक–मुंबई महामार्ग सुव्यवस्थित करण्यासाठी शासन–प्रशासन स्तरावर सर्व प्रकारचे प्रयत्न केले जात आहेत. अशा वेळी नागरिकांनीही सहकार्य करावे, असे जनतेला आवाहन करुन ना. भुसे यांनी बैठकीत झालेल्या सर्व निर्णयांची संबधित अधिकारी–यंत्रणांनी प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. अंमलबजावणी झाली नाही तर संबधित अधिकाऱ्यावर तात्काळ कठोर कारवाई करण्यात येईल, अशा अत्यंत कडक शब्दात उपस्थितांना इशारा दिला. बैठकीच्या सुरुवातीस मंत्री महोदयांचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले आणि शेवटी मंत्री महोदयांनी दिलेल्या सूचनांचे पालन सर्व संबंधित अधिकारी–यंत्रणांकडून अत्यंत गांभीर्याने करण्यात येईल, असे आश्वस्त केले.




**प्रभावीपणे अंमलबजावणी झाली नाही तर संबधित अधिकाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई अत्यंत कडक शब्दात इशारा...**

# पावसाचा जोर वाढला, कल्याण परिसरातील रस्ते जलमय

**कल्याण – राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढल्याचे पाहायला मिळत आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगडमध्ये बुधवारी म्हणजेच काल आणि गुरुवारी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला. तसेच हवामान विभागाने बुधवारी मुंबईसाठी यलो अलर्ट, ठाणे पालघरसाठी ऑरेंज आणि रायगडसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. तर दुसरीकडे सतत पडणाऱ्या पावसामुळे कल्याणमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील रस्ते जलमय झाले आहेत.**

जूनमध्ये मंदावलेला मान्सून जुलैमध्ये बऱ्यापैकी सक्रिय झाला आहे. सोमवारपासून पावसाचा जोर थोडा कमी झाला असला तरी बुधवारपासून पावसाचा जोर पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. बुधवारी दुपारपासून मुंबईसह एमएमआरमध्ये मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. बुधवारीही मुंबईत मुसळधार पावस कोसळत आहेत. काल(२४ जुलै) सकाळापासूनच कल्याण–डोंबिवलीसह आसपासच्या परिसरात पावसाची संततधार सुरु आहे. परिणामी कल्याणमधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील रस्ते जलमय झाले आहे. रस्त्यावर गुडघाभर पाणी साचल्याने वाहनचालक तसेच नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. कल्याणमधील चेतना परिसरात देखील पावसामुळे पाणी साचले आहे. दरम्यान एवढी वर्षे झाली पण पाणी साचण्याच्या समस्येवर उपाययोजना केली नसल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे.



## २३१८ मिमी पावसाची नोंद

मुंबई शहरात साधारणपणे २०९४ मिमी आणि उपनगरात २३१८ मिमी पाऊस असावा. त्याचवेळी १ जून ते मंगळवार सकाळी ८.३० वाजेपर्यंत शहरात १७१५ मिमी तर उपनगरात १७९७ मिमी पावसाची नोंद झाली आहे. बीएमसीकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार, सोमवारी सकाळी ८ ते मंगळवारी सकाळी ८ वाजेपर्यंत शहरात ५९ मिमी, पूर्व उपनगरात ५१ मिमी आणि पश्चिम उपनगरात ४३ मिमी पाऊस झाला आहे.

मुंबईत गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे १० ठिकाणी घरांची पडझड, झाडे पडणे आणि शॉर्टसर्किटच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मुंबईत घर आणि भिंत कोसळण्याच्या १० घटना घडल्या आहेत. यापैकी शहरात ४, पूर्व उपनगरात ३ आणि पश्चिम उपनगरात ३ ठिकाणी घरे आणि भिंती कोसळल्या. बीएमसी आपत्ती नियंत्रण कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, ग्वालिया टँकमध्ये बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील बाल्कनीचा काही भाग अचानक कोसळला.







■ ठाण्यात बुधवारी सकाळीपासून पडणाऱ्या संततधार पावसामुळे वंदना एसटी स्थानक, ठाणे होलसेल मार्केट परिसरात पाणी साचले. (छाया – मनोज सिंह)

## अभिनंदन....




## राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अबॅकस ऑलिम्पियाड स्पर्धेत ठाण्याची श्रुती पांडे दुसरी...

ठाणे : संत ज्ञानेश्वर नगरातील संकल्प इंग्लिश स्कूल मध्ये इयत्ता ७ वी मध्ये शिकणारी मैत्री सेवाभावी संस्था फाऊंडेशनची सदस्य कु. श्रुती राकेश पांडे हिने रेडिसन हॉटेल अंधेरी, मुंबई मध्ये झालेल्या चीन, तैवान, जपान, कोरिया, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका, पनामा, इराण, इंडोनेशिया, तामिळनाडू, राजस्थान,या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय देशातील विद्यार्थ्यांसोबत झालेल्या अबॅकस ऑलिम्पियाड २०२४ स्पर्धेत वय वर्ष १२ असणारी श्रुती पांडे हिने दुसरा क्रमांक पटकावला. ही परीक्षा ४ वर्षापासून ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांमध्ये वयानुसार ग्रूप मध्ये घेतली जाते, या मध्ये ३ मिनिटचे ३ आणि १ मिनिटचे ३ टायमर लावून गणिते सोडवले जातात. स्वा सावरकर नगर वंडर किड्स अकॅडेमी अबॅकस सेंटरची ही विद्यार्थीनी आहे. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात तिला पारितोषिक देऊन गौरवण्यात आले या यशामुळे गुणवंत विद्यार्थिनी श्रुती पांडे हिचे सर्व क्षेत्रातून कौतुक केले जात आहे.

# अनाधिकृत नळ कनेक्शनवर कारवाई गुन्हा दाखल

भिवंडी – भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे समदनगर, कणेरी या ठिकाणी श्री. महेश डाईंग इंडस्ट्रीजचे श्री. सुरेश पटेल यांनी मनपाच्या रस्त्याची खोदाई करुन गटारीतून व नाल्यातुन अनाधिकृतपणे पाईप लाईन टाकल्यामुळे त्यांचेवर भिवंडी शहर पोलीस स्टेशन येथे भा.द.स.१८६० अन्वये कलम ४२७,४३२,४३१ व २७० अन्वये दिनांक ०६/०६/२०२४ रोजी गुन्हा दाखल करुन दिनांक ०७/०६/२०२४ रोजी सदरची पाईप लाईन कटींग करण्याची कारवाई तत्कालीन पाणी पुरवठा विभाग प्रमुख शेखर चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पथक प्रमुख सायरा अन्सारी यांनी कारवाई केली होती. परंतु सदर डाइंग मालक यांनी सदर पाईप लाईन अनधिकृतपणे परत जोडून घेतली ही बाब लक्षात येताच दि.२२/०७/२०२४ रोजी सदर ठिकाणी पाहाणी केली असता सदरची पाईप लाईन पुन्हा जोडली असल्याने ती कटींग करण्याची कारवाई करुन दि.२४/०७/२०२४ रोजी महेश इंडस्ट्रीजचे मॅनेजर सुरेश पटेल यांचे विरोधात भिवंडी शहर पोलीस स्टेशन येथे भा. न्या. से (इ.छ.ड) २०२३ चे कलम ३२४ (४),३२६ (ग) ३२६, २७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यांची कारवाई करण्यांत आली. सदरची कारवाई मा प्रशासक तथा आयुक्त सो, यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता संदिप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली उप अभियंता सर्फराज अंसारी यांचे आधिपत्याखाली श्री. विराज भोईर (पथक प्रमुख) यांचेमार्फत करण्यांत आली.

## ‘प्रेमासाठी’ नगमा ‘सनम’ बनून एक महिना राहिली पाकिस्तानात;

# बनावट पासपोर्टवर केला पाकिस्तानचा दौरा...

ठाणे – बनावट कागदपत्रावर फेक पासपोर्ट बनवून महिलेनं पाकिस्तानचा दौरा केल्यानं मोठी खळबळ उडाली. या प्रकरणी वर्तकनगर पोलिसांनी या महिलेसह आणखी दोघांवर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी महिलेला अटक केली असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती दिली. नगमा नूर मकसूद अली उर्फ सनम खान असं बनावट पासपोर्टवर पाकिस्तानचा दौरा करणाऱ्या महिलेचं नाव आहे. वर्तकनगर पोलीस ठाण्यात नगमा नूर मकसूद अली उर्फ सनम खान हिच्यावर १९ जुलैला गुन्हा दाखल करण्यात आला होता.



महिलेनं बनावट कागदपत्रावर बनवला फेक पासपोर्ट : ठाण्याच्या लोकमान्य नगर बस डेपोजवळ असलेल्या एका एजंटकडून बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड, तसंच पासपोर्ट काढण्यासाठी आवश्यक असलेले दस्तावेज बनवून या महिलेनं पासपोर्ट मिळवला. त्याच पासपोर्टवर नगमा नूर मकसूद अली उर्फ सनम खान हिनं पाकिस्तानवारी केली. याबाबतची माहिती वर्तकनगर पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच वर्तकनगर पोलिसांनी नगमा नूर मकसूद अली उर्फ सनम खान हिच्यावर गुन्हा दाखल करत तिला अटक केली. बनावट दस्त बनवणाऱ्या व्यक्तीचा शोध वर्तकनगर पोलीस घेत आहेत.

**काय आहे नेमकी घटना :** सनम खान उर्फ नगमा या २३ वर्षाच्या विवाहित तरुणीनं ठाण्यातून थेट पाकिस्तान गाठलं. त्यासाठी तिने खोटी कागदपत्रं बनवली. त्याच्या सहाय्याने ती पाकिस्तानात पोहोचली. एक महिन्याच्या कालावधीनंतर ती भारतातही परतली. पुन्हा पाकिस्तानला जाण्याची ती तयारी करत होती. मात्र, त्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर तिला ताब्यात घेतलं. तिची जेव्हा चौकशी करण्यात आली त्यावेळी सर्व माहिती समोर आली. त्यामुळं पोलिसांच्या कामगिरीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

## असा प्रकार आला समोर :


सनम खान उर्फ नगमा ही मुळची उत्तर प्रदेशची आहे. तिचं वय २३ वर्ष आहे. तिचं लग्न झालं असून तिला दोन मुली आहेत. पण ती सध्या नवऱ्यापासून विभक्त राहाते. तिची आई ठाण्यात राहाते. उत्तर प्रदेशातून ती थेट तिच्या आईकडे ठाण्याला मुलींसह आली. तिची इन्स्टाग्रामवरून पाकिस्तानातल्या बशीर याच्या बरोबर मैत्री झाली. ते दोघे सहा महिने एकमेकांच्या संर्पकात होते. त्यांच्यात प्रेम झालं. त्यानं सनमला पाकिस्तानात येण्यासाठी सांगितलं. त्याच्या बोलवण्यावरून सनम पाकिस्तानला जाण्यास तयार झाली. तिने कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यास सुरूवात केली आणि तिला एक महिन्याचा व्हिसाही मिळाला. ती तिच्या दोन मुलींसह पाकिस्तानात पोहोचली आणि तिथे तिनं लग्नही केलं. एक महिना ती बशीर बरोबर राहिली. एक महिन्याचा व्हिसा तिच्याकडं होता. शिवाय तिची आईही आजारी होती. त्यामुळं तिने ठाण्याला परतण्याचा निर्णय घेतला आणि ती आईकडे आली. त्यानंतर तिला पुन्हा पाकिस्तानला जायचं होतं. यावेळी मात्र, तिला ठाणे पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. तिची चौकशी केल्यानंतर तिने झालेला सर्व प्रकार पोलिसांना सांगितला. या प्रकरणाची चौकशी आता केंद्रीय यंत्रणा करत आहेत. दरम्यान पोलिस व्हेरिफीकेशनवेळी मोठी चूक झाल्याचंही समोर आलं आहे.




दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक महाराष्ट्र सम्राट
परिवारास १३ व्या
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा
LISA LINE
Bringing Cold Chain Innovations
Quality Cold Up To Last Miles. ENSURED...
Mr.Virendra Tipnis | Mr.Ajit Tamhane
Director, Lisa Line


भारतीय जनता पार्टी
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास...
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
व पुढील वाटचालीसाठी अनेकानेक सदिच्छा !
१३ वा वर्धापन दिन
१३ वर्षे विश्वासाची
आणि सातत्याची...
शुभेच्छुक
श्री.रविंद्र चव्हाण
सार्वजनिक बांधकाम,
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री
पालकमंत्री : पालघर व सिंधुदुर्ग जिल्हा


सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक महाराष्ट्र सम्राट
वृत्तपत्रास...
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा!
व पुढील वाटचालीसाठी अनेकानेक सदिच्छा !
१३ वा वर्धापन दिन
ॲड.चेतन पाटील
युवा प्रदेशाध्यक्ष : कोळी महासंघ
महाराष्ट्र राज्य
भारतीय जनता पार्टी
श्री.रमेशदादा पाटील
आमदार : विधानपरिषद महाराष्ट्र राज्य
राष्ट्रीय अध्यक्ष : कोळी महासंघ


भारतीय जनता पार्टी
१३ वा वर्धापन दिन
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
दैनिक महाराष्ट्र सम्राट
यांना
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !
शुभेच्छुक
श्री.निरंजन डावखरे
आमदार-कोकण पदवीधर मतदारसंघ
मा.अध्यक्ष - ठाणे (शहर) जिल्हा - भाजपा











'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१